आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
८ फेब्रुवारी २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मलेशिया दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मायदेशी परतले

- आगामी ५ वर्षांमधे अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू विकत घेण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचं मंत्री पीयुष गोयल यांनी केलं स्पष्ट

- महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी उद्या मतमोजणी

**आणि**

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत चुरशीच्या सामन्यात इंग्लंडची नेपाळवर मात

**<><><><><>**

दोन दिवसांचा मलेशिया दौरा आटोपून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मायदेशी परतले. दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी उभय देशांमधे संरक्षण, सेमीकंडक्टर्स, आणि व्यापार अशा वेगवेगळ्या क्षेत्रात सहकार्याबाबत चर्चा झाली. मलेशियाबरोबर भारताचं विशेष नातं असल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर संयुक्त निवेदनात व्यक्त केली. दहशतवादाविरोधात मित्र देशांना पूर्ण सहकार्य देण्याचं भारताचं धोरण असून त्याबाबत दुटप्पीपणा किंवा कोणतीही तडजोड होणार नाही असं मोदी यांनी स्पष्ट केलं.....

- **- - होल्ड- बाईट- मोदी - - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय तंत्रज्ञान, आरोग्य, आणि अन्न सुरक्षा या क्षेत्रात परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचा निर्धार दोन्ही पक्षांनी व्यक्त केला. आशिया प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता आणि विकास याउद्दिष्टांसाठी ही मैत्री आवश्यक असल्याचं मोदी म्हणाले.

या चर्चेपूर्वी प्रधानमंत्री मोदी यांचं पारंपरिक मानवंदना देऊन स्वागत करण्यात आलं.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेतले माजी सैनिक जयराज राजा राव क्वालालुंपूर इथं राहत असून त्यांची भेट प्रधानमंत्र्यांनी घेतली. भारताच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल राव यांनी मोदी यांचं अभिनंदन केलं.

या द्विपक्षीय चर्चेनंतर विविध क्षेत्रातल्या ११ महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

<><><><><>

आगामी ५ वर्षांमधे अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू विकत घेण्यात कोणतीही अडचण येणार नही असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. भारत- अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर ते पीटीआय या वृत्तसंस्थेला मुलाखत देत होते. हवाई वाहतूक क्षेत्रासाठी १०० अब्ज डॉलर्स किमतीचा माल आवश्यक असून इंधन तेल, कच्चं तेल, एलपीजी आणि एलएनजी वायू देखील खरेदी केला जाईल. विमानं, त्यांचे सुटे भाग, मौल्यवान खनिजं, तंत्रज्ञान, आणि दगडी कोळसा हा माल अमेरिकेकडून खरेदी करण्याची तयारी भारतानं या करारात दर्शवली आहे. सध्या अमेरिकेकडून दरवर्षी ४० ते ५० अब्ज डॉलर्सचा माल भारतात येतो.

या व्यापार करारामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय मालावरचं आयातशुल्क अमेरिकेत सर्वात कमी झालं आहे असं त्यांनी सांगितलं.

अमेरिकेतून येणाऱ्या दुग्धोत्पादनांवर, तसंच जी एम उत्पादनांवर भारताने आयातशुल्कात कोणतीही सूट दिलेली नाही असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

नक्षलवादाविरोधात सुरक्षेवर भर देऊन राबवलेलं धोरण, पायाभूत सुविधांचं सक्षमीकरण, नक्षलवाद्यांच्या आर्थिक व्यवस्था खिळखिळीत करणं आणि शरणागतीसाठीचं धोरण यामुळे सकारात्मक परिणाम झाला असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. शाह यांनी आज छत्तीसगढची राजधानी रायपूर इथं नक्षलवाद विरोधातील कारवाया आणि विविध विकासकामांसंदर्भात दोन उच्चस्तरीय आढावा बैठका घेतल्या. त्यानंतर यासंदर्भातली माहिती त्यांनी समाजमाध्यमावर सामायिक केली. यावर्षी ३१ मार्चपूर्वी नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात येईल असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

विकसित भारताच्या वित्तपुरवठ्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम असे मोठे वित्तपुरवठादार तयार करण्याच्या उद्देशानं, सरकार लवकरच ‘विकसित भारत बँकिंग’ संदर्भात, एक उच्च स्तरीय समिती स्थापन करणार आहे, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. विकसित भारताला वित्त पुरवठा करण्यासाठी बँकिंग व्यवस्था

कशी सक्षम करता येईल याच्या उपाययोजना ही समिती सुचवेल अशी अपेक्षा असल्याचं निर्मला सीतारामन यांनी एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं. ही समिती केवळ बँकांच्या विलीनीकरणापुरती मर्यादित नसून भारताची बँकिंग प्रणाली सक्षम बनवण्यवासाठी उपाय सुचवणं तिचा मुख्य उद्देश आहे, हे त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

गेले सलग तीन महिने भारताच्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेत असलेल्या परकीय गुंतवणुकदारांनी, फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्याच आठवड्यात पुन्हा एकदा ८ हजार १२९ कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक केली आहे. अमेरिका आणि भारतात झालेला व्यापारी करार आणि अर्थसंकल्पातल्या सकारात्मक तरतुदींमुळे परकीय गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला असल्याचं तज्ज्ञांनी म्हटलं आहे.

याआधी परकीय गुंतवणूकदारांनी जानेवारीमध्ये ३५ हजार ९६२ कोटी रुपये, डिसेंबरमध्ये २२ हजार ६११ कोटी रुपये आणि नोव्हेंबरमध्ये ३ हजार ७६५ कोटी रुपये बाजारपेठेतून काढून घेतले होते.

<><><><><>

महाराष्ट्रात परकीय गुंतवणुकीतून उभ्या राहात असलेल्या उद्योगांची संख्या वाढत असून, ७५ टक्के करार हे प्रत्यक्षात उतरत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज अहिल्यानगरमध्ये एका ॲल्युमिनियम कास्टिंग कंपनीनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. गेल्या वर्षी दावोस येथे झालेल्या गुंतवणूक करारांमधून उत्तर महाराष्ट्रातल्या ५ जिल्ह्यांमध्ये रोजगाराच्या ७५ हजार संधी उपलब्ध झाल्या असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. या करारांच्या माध्यमातून होणार असलेल्या ५० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीपैकी एकट्या अहिल्यानगर जिल्ह्यात ११ हजार ५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या मतमोजणी होणार आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. मतमोजणीसाठी राज्य निवडणूक आयोगानं सुरक्षेसह सर्व व्यवस्था केली आहे. काल

या निवडणुकीसाठी सर्वत्र शांततेत मतदान झालं. एकूण सरासरी ६८ पूर्णांक २८ शतांश टक्के मतदान झाल्याचं राज्य निवडणूक आयोगानं कळवलं आहे.

<><><><><>

केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज छत्रपती संभाजीनगर इथं आयुष मंत्रालय आणि केंद्र सरकारच्या आरोग्य योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या वेलनेस सेंटरचं उद्घाटन झालं. हे केंद्र सर्वांगीण आरोग्य सेवेच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल आहे, असं जाधव यावेळी म्हणाले. केंद्र सरकार आजारांवरच्या उपचारांबरोबरच प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्राधान्य देत असून, “उपचारापेक्षा प्रतिबंध” या तत्त्वावर काम करत आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५ च्या प्राप्तीकर कायद्याशी संबंधित प्राप्तीकर नियम आणि अर्जांबाबत संबंधितांकडून सूचना मागवल्या आहेत. राष्ट्रपतींनी गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये या कायद्यावर स्वाक्षरी केली होती. त्यानंतर आता येत्या १ एप्रिलपासून हा कायदा लागू होणार आहे.

<><><><><>

बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतात अवैध वास्तव्य करणाऱ्या चार बांगलादेशी नागरिकांना आज मुंबईतल्या कुरार गावातून अटक करण्यात आली. त्यांच्याकडून बांगलादेशी नागरिकत्वाचे पुरावे जप्त करण्यात आले असून त्यांना मायदेशी परत पाठवण्याची कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात चुरशीच्या लढतीत इंग्लंडने नेपाळवर चार धावांनी मात केली. ग्रुप सी मधील इंग्लंड आणि नेपाळ यांच्यात मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात आलेला सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला. इंग्लडनं नेपाळचा ४ धावांनी पराभव केला असला तरी नेपाळच्या संघानंही चांगलाच लढा दिला. इंग्लंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत नेपाळ समोर विजयासाठी १८५ धावाचं आव्हान ठेवलं. त्याचा पाठलाग करतांना नेपाळला १८० धावांवर रोखण्यात इंग्लंडला यश आलं.

त्याआधीच्या आजच्या पहिल्या सामन्यात चेन्नई इथं आजच्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडने अफगाणिस्तानवर ५ गडी राखून विजय मिळवला. अफगाणिस्ताननं न्यूझिलंडला विजयासाठी १८३ धावाचं आव्हान दिलं होतं. ते न्युझीलंडने ५ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १७ षटकं ५ चेंडूत पूर्ण केलं.

आर्यलंड आणि श्रीलंका यांच्यातला ग्रुप बी चा सामना कोलंबोच्या के आर प्रेमदासा स्टेडियमवर थोड्याच वेळात सुरु होत असून आर्यलंडनं नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

डेविस चषक टेनिस सामन्यांमधे भारताच्या युकी भांबरी आणि दक्षिणेश्वर सुरेश या जोडीनं आज नेदरलँडच्या डेविड पेल आणि सँडर ऍरेंड्स या जोडीला हरवून पात्रता फेरीत २-१ अशी आघाडी मिळवली आहे. बंगळुरू इथं आज दीर्घकाळ चाललेल्या या लढतीत भारताच्या जोडीनं नेदरलँड्सवर ७-६, ३-६, ७-६ अशी मात केली.

**//<><><><><>//**